# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.८५ दिनांक ३१/०८/२०२१

## "पालघर पोलीसांनी पुरस्थितीत वाचवले जनसामान्यांचे प्राण"

पालघर जिल्हा हा अति पर्जन्यवृष्टीसाठी प्रसिद्ध आहे. पालघर जिल्हयात डोंगर/जंगलांचे प्रमाण जास्त असल्याने बरेचसे दळणवळणाचे रस्ते हे डोंगर द-यातुन जंगलातुन जात असल्याने दरडी कोसळून/झाडे पडून रस्ते बंद होणे, पुर आल्याने छोटेपुल/खोलगट व सखल भागातील वस्त्या पाण्याखाली जाणे असे प्रकार होत असतात. त्यामुळे श्री. दत्तात्रय शिंदे (भापोसे) पोलीस अधीक्षक पालघर यांनी पालघर जिल्हयातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांची आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मान्सुनपुर्व बैठक आयोजीत करुन पावसाळयामध्ये वरीलप्रमाणे प्रकार झाल्यास त्यावर करावयाच्या उपाययोजनाबाबत मार्गदर्शन केले होते.

दि.३१/०८/२०२१ रोजी पालघर जिल्हयात पहाटे पासुनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार अतिपर्जन्यवृष्टी होऊन पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी अपर पोलीस अधीक्षक, पालघर, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी आणि जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे अधिकारी यांना सतर्क राहुन कोणत्याही प्रकारची जिवित अथवा वित्तहानी होऊ नये यासाठी हद्दीतील लोकांना सुरक्षीत स्थळी हलविणे, धोकादायक रस्त्यावरुन कोणाला जाऊ न देणे व आपत्ती व्यवस्थापन साहीत्यासह पथके तयार करुन आवश्यक ती खबरदारी घेत लोकांच्या जिविताचे तसेच मालमत्तेचे रक्षण करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

आज दिनांक ३१/०८/२०२१ रोजी पहाटेपासुन मुसळधार पाऊस सुरु असुन घोलवड पोलीस ठाणे हद्दीतील बोर्डी, घोलवड, चिखले येथील सखल भागातील वस्त्या,पाडयातील सुमारे १०० हुन अधिक घरांमध्ये पाणी भरल्याची बातमी श्री. रविंद्र पारखे, प्रभारी अधिकारी, घोलवड यांना मिळाली होती. बातमी मिळताच पहाटे श्री. रविंद्र पारखे, प्रभारी अधिकारी, घोलवड, पोउपनि/मयुर शेवाळे व घोलवड पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अमंलदार यांनी बोर्डी येथील धुंडीयापाडा,बाभुळतलाव, मरवड या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन तेथील १०० हुन अधिक लोकांना विश्राम धाम, कॅम्पिंग ग्राऊड शेजारी, बोर्डी येथे सुरक्षीत स्थळी स्थलातंरीत केले. यामध्ये ४५ वृध्द इसम व लहान मुलांचा समावेश आहे. सदर स्थलांतरीत लोकांना फुड पॅकेट, बिस्किट, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले आहे.

दिवसभर सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे झाई खाडीमध्ये पुर परिस्थिती निर्माण होऊन त्यामध्ये ३ युवक वाहुन जात होते. घोलवड पोलीसांनी स्थानिकांच्या मदतीने स्वत:चा जिव धोक्यात घालुन त्या ३ इसमांना खाडीतुन बाहेर काढले आहे. त्या ३ इसमांपैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यास तात्काळ उमरगांव येथील हॉस्पीटलमध्ये पुढील उपचाराकामी दाखल करण्यात आले आहे.

सहा. पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र पारखे, प्रभारी अधिकारी, घोलवड व घोलवड पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अधिकरी व अमंलदार यांनी केलेल्या या उत्कृष्ठ कामगीरीची पालघर जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय शिंदे यांनी दखल घेत सदर अधिकारी अमंलदार यांना बक्षीस जाहीर केले आहे.